राज्य ब्रॉडबँड समितीचे पुनर्गठन
व जिल्हास्तरीय दूरसंचार समिती
गठीत करण्याबाबत..

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग (मातं)**
**शासन निर्णय क्रमांक : संकिर्ण-१७२६/प्र.क्र.०४/मातं**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक: १५ एप्रिल, २०२६

**वाचा**: १. सामान्य प्रशासन (माहिती तंत्रज्ञान) विभाग, शासन निर्णय क्र. GAD-11090/2/2020/ DIRECTORATE OF IT, दिनांक 30/07/2020.
२. Department TeleCommunication, National Broadband Mission 2.0 Vision Document, Dated 08/01/2025.

**प्रस्तावना:**

केंद्र शासनाच्या दूरसंचार मंत्रालयामार्फत (Ministry of Communications) सन २०१९ मध्ये राष्ट्रीय ब्रॉडबँड मिशन सुरू करण्यात आले असून, सदर मिशनच्या राज्यस्तरावरील अंमलबजावणी व सनियंत्रणासाठी मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली राज्य ब्रॉडबँड समिती स्थापन करण्याबाबत NBM Vision Document मध्ये तरतूद करण्यात आली होती. त्यानुसार सामान्य प्रशासन (माहिती तंत्रज्ञान) विभागाच्या वाचा क्र. १ येथील शासन निर्णयान्वये राज्य ब्रॉडबँड मिशन समिती गठीत करण्यात आली आहे.

तथापि, केंद्र शासनाच्या दूरसंचार मंत्रालयामार्फत सन २०२५ पासून राष्ट्रीय ब्रॉडबँड मिशन 2.0 (NBM 2.0) सुरू करण्यात आले असून, त्यानुषंगाने दिनांक ०८ जानेवारी, २०२५ रोजी सन २०२५-३० या कालावधीसाठीचे NBM 2.0 Vision Document प्रसिद्ध करण्यात आले आहे. सदर Vision Document मध्ये राज्य ब्रॉडबँड समितीची सुधारित रचना व समितीची कार्ये नव्याने विहित करण्यात आलेली आहेत. त्यानुषंगाने वाचा क्र. १ येथील शासन निर्णयान्वये गठीत करण्यात आलेल्या राज्य ब्रॉडबँड समितीच्या ऐवजी NBM 2.0 Vision Document नुसार नव्याने राज्य ब्रॉडबँड समिती तसेच जिल्हा/महानगरपालिका

क्षेत्रात मिशनच्या प्रगतीचा मासिक आढावा घेण्यासाठी/देखरेख ठेवण्यासाठी जिल्हास्तरीय दूरसंचार समिती गठीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:**

वाचा क्र. १ येथील शासन निर्णय अधिक्रमित करून NBM 2.0 Vision Document च्या धर्तीवर राज्यात राष्ट्रीय ब्रॉडबँड मिशनच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी खालीलप्रमाणे राज्यस्तरीय ब्रॉडबँड समिती (State Broadband Committee) गठीत करण्यात येत आहे.

अ) राज्यस्तरीय ब्रॉडबँड समितीची रचना (State Broadband Committee):

| **Sr.no.** | **Structure of state level SBC (Officials/Representative)** | |
|---|---|---|
| 1. | Hon. Chief Secretary | Chairman |
| 2. | Additional chief secretary/principal secretary/ secretary (Information Technology) | Member |
| 3. | Additional chief secretary/principal secretary/secretary(UDD-1) | Member |
| 4. | Additional chief secretary/principal secretary/secretary(UDD-2) | Member |
| 5. | Additional chief secretary/principal secretary/secretary(PWD) | Member |
| 6. | Additional chief secretary/principal secretary/secretary(Forest and Environment ) | Member |
| 7. | CGM, Bharat Sanchar Nigam Ltd. (BSNL) | Special Invitee |
| 8. | Representative of the Cellular Operators Association of India (COAI) | Special Invitee |
| 9. | President Internet service Providers Association of India (ISPAI) | Special Invitee |
| 10. | Special DGT/Additional DGT of DoT working in the Licensed service Area (LSA) | Member Convener |

आ) राज्य ब्रॉडबँड समितीची कार्ये (Functions) खालीलप्रमाणे असतील:

i. To advise, either suo-moto or on a request from the Governing Council or Steering Committee on the matters relating to the accomplishment of the objectives of the Mission concerning the State.

ii. To facilitate implementation of the guidelines issued by the Governing Council or Steering Committee enabling expansion of broadband services for the socio-economic development of the State.

iii. To address all matters regarding DCRI.

iv. iv. To get the provisions of the Telecommunications Act 2023, and Right of Way rules in accordance with the act issued by the Central Government implemented including the implementation of common telecom ducts in linear infrastructure projects of States/UTs.

v. Monitoring and evaluation of the work of the Mission in the State.

vi. The Committee may meet once every quarter or at intervals as deemed fit and call other Departments of State Government and experts as per requirement.

२. जिल्हा/महानगरपालिका क्षेत्रात राष्ट्रीय ब्रॉडबँड मिशनच्या प्रगतीचा मासिक आढावा घेण्यासाठी/देखरेख ठेवण्यासाठी खालीलप्रमाणे जिल्हास्तरीय दूरसंचार समिती (**District Level Telecomm Committee**) गठीत करण्यात येत आहे.

अ) जिल्हास्तरीय दूरसंचार समितीची (**District Level Telecomm Committee**) रचना:

| **Sr.no.** | **District Level Telecomm Committee (Officials/Representative)** | |
|---|---|---|
| १. | जिल्हाधिकारी | अध्यक्ष |
| २. | महानगरपालिका आयुक्त | सह-अध्यक्ष |
| ३. | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद | सह-अध्यक्ष |
| ४. | पोलीस अधीक्षक / पोलीस आयुक्त प्रतिनिधी | सदस्य |
| ५. | जिल्हा उपवनसंरक्षक यांचे प्रतिनिधी | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ६. | मुख्य कार्यकारी अभियंता, महावितरण यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| ७. | मुख्य कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| ८. | जिल्हा सूचना विज्ञान अधिकारी, National Informatics Centre | सदस्य |
| ९. | जिल्हा प्रकल्प व्यवस्थापक | Special Invitee |
| १०. | इतर आवश्यक विभागांचे प्रतिनिधी (गरजेनुसार) | Special Invitee |
| ११. | जिल्हाधिकारी कार्यालयाकडून नामनिर्देशित अधिकारी | सदस्य सचिव |

आ) जिल्हास्तरीय दूरसंचार समितीची (**District Level Telecomm Committee**) कार्ये (Functions) खालीलप्रमाणे असतील:

१. जिल्हा/महानगरपालिका क्षेत्रात राष्ट्रीय ब्रॉडबॅंड मिशनच्या प्रगतीवर देखरेख ठेवणे.

२. जिल्हा/महानगरपालिका क्षेत्रात राष्ट्रीय ब्रॉडबॅंड मिशनच्या प्रगतीचा मासिक आढावा घेणे व त्याबाबतचा अहवाल राज्यस्तरीय समितीस सादर करणे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र. २०२६०४१५१७५४११७७०७ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने स्वाक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by DURGAPRASAD POCHAYYA MYLAWARAM
Date: 2026.04.15 17:55:21 +05'30'

**(दुर्गाप्रसाद मैलावरम)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत:**

१. मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई,
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
३. मा. महाराष्ट्र विधान परिषद सभापती यांचे खाजगी सचिव, विधान भवन, मुंबई,
४. मा. महाराष्ट्र विधान सभा अध्यक्ष यांचे खाजगी सचिव, विधान भवन, मुंबई,
५. मा. उप मुख्यमंत्री ( नगर विकास व गृहनिर्माण ) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई,

६. मा. उप मुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क, क्रीडा व युवक कल्याण, अल्पसंख्याक विकास व औकाफ) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई,
७. सर्व मा. मंत्री/मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
८. मा. विरोधी पक्ष नेता, विधान परिषद, विधान भवन, मुंबई,
९. मा. विरोधी पक्ष नेता, विधान सभा, विधान भवन, मुंबई,
१०.मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई,
११.शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
१२.प्रधान सचिव, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय,
१३.प्रबंधक, उच्च न्यायालय (मुळ शाखा) मुंबई,
१४.प्रबंधक, उच्च न्यायालय (अपिल शाखा) मुंबई,
१५.प्रबंधक, लोकायुक्त व उपलोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
१६.महालेखापाल १/२ लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र, मुंबई/नागपूर,
१७.महालेखापाल १/२ लेखा व परीक्षा, महाराष्ट्र, मुंबई/नागपूर,
१८. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
१९.सर्व पोलीस आयुक्त,
२०.सर्व विभागीय आयुक्त,
२१.सर्व महानगरपालिकांचे आयुक्त,
२२.सर्व जिल्हाधिकारी,
२३.सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
२४.सर्व नगरपालिका/परिषदांचे मुख्याधिकारी,
२५.मंत्रालयीन विभागांच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
२६.निवडनस्ती/मातं